| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ११२ वा | बुधवार दिनांक ०८ जुलै २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### ॲल्युमिनिअमची तार अंदाजे ₹ २,६४,००० किंमतीची जबरीने चोरी

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नागेशा टी, वय ३९ वर्षे, रा. टी. एन.कोटे ता. चेल्लाकेरे जि. चित्रदुर्ग राज्य कर्नाटक, ह.मु. अणदुर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांची चिवरी शिवारातील शेत गट नं २६२, २७९, २८० मधील टॉवर क्र ३४/२ व एपी ३५ चे ठिकाणी अनोळखी तीन लोकांनी फिर्यादीचे कंपनीचे कामगारमंजल किसकु व बबलु टुडु यांना जिवे ठार मारण्याची धमकी देवून लाथाबुक्यांनी मारहाण करुन टॉवरला बांधून ठेवून कंपनीमधील ३८० मिटर लांबीची ३२ मी.मी ॲल्युमिनिअमची तार अंदाजे २,६४,००० किंमतीची जबरीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-नागेशा टी यांनी दि.०६.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०९(६), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### धाराशिव येथून मोटारसायकलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी जनार्धन विश्वनाथ माने, वय ५९ वर्षे, रा. शाहुनगर धाराशिव ता. जि. धाराशिव यांची हिरो स्प्लेंडर मोटरसायकल ही दि.०४.०७.२०२६ रोजी १३.०० ते १८.०० वा. सु.हतलाई देवी मंदीराकडे जाणाऱ्या लोखंडी कमाणीच्या बाजूला धाराशिव येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-जनार्धन माने यांनी दि.०६.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### वाळु गौजखनिज चोरी : गुन्हा दाखल

आंबी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसासकडून समजलेली माहिती अशी की, भिमराव तात्यासाहेब माने, विकास रमेश गाढवे,दोघे रा. देवळगाव ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.२८.०६.२०२६ रोजी मुगाव ते डोंजा जाणारे रोडवर टिप्पर क्र एमएच १२ एच.डी. ९७३८ मध्ये तीन ब्रास वाळु वाहनासह एकुण ५,२१,०००किंमतीचे वाळु गौजखनिज चोरी करुन लबाडीच्या उद्देशाने टिपर मध्ये वाहतुक करताना मिळून आला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सायली रविंद्र शिंदे,(ग्राम महसुल अधिकारी मुगाव) रा. प्रेरणा नगर परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.०६.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आंबी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२), ३(५), सह कलम २१(१)(२) खाण आणि खनिज अधिनियम सह कलम ४८(७)(८) महा.जमीन महसुल संहिता अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**झाडे लावा!**
**झाडे जगवा!!**
**झाडे तोड रोखा !!!**

## प्रत्येक शेतकऱ्याने अँग्रीस्टॅक आयडी तयार करून घ्यावा : भविष्यातील सर्व कृषी योजनांसाठी ठरणार महत्त्वाचा आधार- जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार

### अँग्रीस्टॅक नोंदणीत धाराशिवची दमदार वाटचाल: जिल्ह्यात ४ लाख ७७ हजार ४४ शेतकऱ्यांपैकी ३ लाख ८९ हजार २३ शेतकऱ्यांची नोंदणी पूर्ण



धाराशिव (जिमाका) - राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी अँग्रीस्टॅक (AgriStack) उपक्रमात धाराशिव जिल्हा सातत्याने उल्लेखनीय प्रगती करत आहे. ७ जुलै २०२६ पर्यंत जिल्ह्यातील ४ लाख ७७ हजार ४४ खातेदारांपैकी ३ लाख ८९ हजार २३ शेतकऱ्यांची अँग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण झाली असून, जिल्ह्याची एकूण प्रगती ८१.५५ टक्क्यांवर पोहोचली आहे.६ जुलै रोजी एकाच दिवसात जिल्ह्यात २५ नवीन नोंदणीची भर पडली. तालुकानिहाय पाहता तुळजापूर येथे सर्वाधिक ९,धाराशिव येथे ६,भूम, उमरगा आणि परंडा येथे प्रत्येकी ३,वाशी येथे १ नोंदणी झाली.कळंब आणि लोहारा तालुक्यात त्या दिवशी नवीन नोंदणी झाली नाही.

तालुकानिहाय प्रगतीमध्ये कळंब तालुका ८६.२९ टक्के नोंदणीसह अव्वल असून,त्यापाठोपाठ उमरगा (८५.७१ टक्के),वाशी (८५.०७ टक्के),लोहारा (८३.२६ टक्के), परंडा (८२.६६ टक्के),भूम (८०.२१ टक्के),धाराशिव (७९.५९ टक्के) आणि तुळजापूर (७५.५० टक्के) असा क्रम आहे.

अँग्रीस्टॅक ही देशातील शेती क्षेत्राला डिजिटल बळ देणारी महत्त्वपूर्ण प्रणाली असून,प्रत्येक शेतकऱ्याचा स्वतंत्र डिजिटल कृषी ओळख क्रमांक (Farmer ID) तयार केला जात आहे.या आयडीमुळे शेतकऱ्यांची जमीन,पिके आणि शासकीय योजनांशी संबंधित माहिती एकाच डिजिटल व्यासपीठावर उपलब्ध होणार आहे. त्यामुळे विविध योजनांचा लाभ मिळविण्याची प्रक्रिया अधिक पारदर्शक,सुलभ आणि वेगवान होईल.

भविष्यात पीकविमा,पीक नोंदणी, कृषी अनुदाने, पीक कर्ज,नैसर्गिक आपत्ती नुकसानभरपाई,कृषी सल्ला,विविध शासकीय योजना तसेच शेतकऱ्यांना थेट लाभ हस्तांतरण (DBT) यांसारख्या अनेक सेवांसाठी अँग्रीस्टॅक फार्मर आयडी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने हा आयडी तयार करून घेणे ही काळाची गरज असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

जिल्हाधिकारी श्री.पुजार यांनी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना आवाहन करताना सांगितले की,ज्या शेतकऱ्यांनी अद्याप अँग्रीस्टॅक नोंदणी केलेली नाही,त्यांनी विलंब न करता जवळच्या कृषी विभाग, ग्रामस्तरीय सुविधा केंद्र किंवा संबंधित नोंदणी केंद्रावर जाऊन आपली नोंदणी पूर्ण करावी.

अँग्रीस्टॅक फार्मर आयडी हा भविष्यातील डिजिटल कृषी व्यवस्थेचा पाया ठरणार असून, शासकीय योजनांचा लाभ कोणत्याही अडचणीशिवाय मिळण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याकडे हा क्रमांक असणे अत्यावश्यक आहे. शासनाच्या कृषीविषयक सेवांचा लाभ वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने मिळावा,यासाठी सर्व शेतकऱ्यांनी अँग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करून या डिजिटल उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा,असेही त्यांनी आवाहन केले.

## ओबीसी समाजासाठी शासनाच्या १३ महामंडळांचे जिल्हास्तरावर कामकाज सुरू

### विविध कर्ज व व्याज परतावा योजनांसाठी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन; पात्र लाभार्थ्यांनी संधीचा लाभ घ्यावा

धाराशिव (जिमाका) इतर मागासवर्गीय समाजाच्या सर्वांगीण सामाजिक व आर्थिक विकासासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ तसेच त्याअंतर्गत कार्यरत १३ उपमहामंडळांची स्थापना केली असून,या महामंडळांचे जिल्हास्तरावरील कामकाज आता धाराशिव येथे सुरू करण्यात आले आहे.विविध कर्ज व आर्थिक सहाय्य योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी करून अर्ज करावेत,असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक श्रीमती वृषाली लहारे यांनी केले आहे.

शासनाने विविध समाजघटकांच्या आर्थिक उन्नतीसाठी स्वतंत्र महामंडळांची स्थापना केली आहे. त्यामध्ये जग्ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ (लिंगायत वाणी),संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ (गुरव समाज),संत सेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळ (न्हावी समाज),लेवा पाटीदार समाज आर्थिक विकास महामंडळ (लेवा समाज),सोळा कुलस्वामिनी आर्थिक विकास महामंडळ (लाडशाखीय वाणी/वाणी),स्व. विष्णुपंत रामचंद्र दादरे (लोणारी) आर्थिक विकास महामंडळ (लोणारी समाज),संत नामदेव महाराज शिंपी समाज आर्थिक विकास महामंडळ (शिंपी समाज),संत भोजलिंग काका सुतार समाज आर्थिक विकास महामंडळ (सुतार समाज),सरदार वल्लभभाई पटेल गुजर समाज आर्थिक विकास महामंडळ (गुजर समाज),संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ (सोनार समाज),संताजी महाराज आर्थिक विकास महामंडळ (तेली समाज), संत श्री.रुपलाल महाराज आर्थिक विकास महामंडळ (बारी समाज) आणि आगरी समाज आर्थिक विकास महामंडळ (आगरी समाज) यांचा समावेश आहे.

या महामंडळांमार्फत लाभार्थ्यांसाठी सहा योजना पूर्णपणे ऑनलाइन स्वरूपात राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये थेट कर्ज योजना (रु.१ लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज),२० टक्के बीज भांडवल योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना,गट कर्ज व्याज परतावा योजना,शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना आणि महिला स्वयंसिद्धी व्याज परतावा योजना यांचा समावेश आहे.या योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र अर्जदारांनी आवश्यक कागदपत्रांसह www.msobcfdc.org या वेब पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करणे अनिवार्य आहे.सर्व प्रक्रिया ऑनलाइन असल्याने अर्जदारांनी विहित मुदतीत अर्ज सादर करून शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

या योजनांबाबत अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीजवळ,धाराशिव येथे संपर्क साधता येईल.

तसेच अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२४७२-२२३८६३ वर संपर्क साधावा,असे जिल्हा व्यवस्थापक श्रीमती वृषाली लहारे यांनी कळविले आहे.

## ई-पीक पाहणी जिल्ह्यात १६.२२ टक्के क्षेत्राची नोंद पूर्ण : शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण करणारी महत्त्वाची डिजिटल नोंद शासनाच्या योजनांचा लाभ

धाराशिव, (जिमाका ) खरीप हंगामातील पिकांची अचूक माहिती शासनाकडे उपलब्ध व्हावी, शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ वेळेत मिळावा तसेच नैसर्गिक आपत्तीच्या वेळी नुकसानभरपाई आणि पीक विमा प्रक्रियेत कोणतीही अडचण निर्माण होऊ नये,यासाठी राज्य शासनाच्या ई-पीक पाहणी मोहिमेला धाराशिव जिल्ह्यात वेग आला आहे.७ जुलै २०२६ पर्यंत जिल्ह्यात १६.२२ टक्के क्षेत्राची ई-पीक पाहणी पूर्ण झाली असून,उर्वरित क्षेत्राची नोंद लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी महसूल आणि कृषी विभाग प्रयत्नशील आहेत.

तालुकानिहाय प्रगतीमध्ये भूम तालुका २६.१३ टक्के नोंदींसह प्रथम क्रमांकावर असून,वाशी (२३.७२ टक्के) आणि परंडा (२१.२४ टक्के) हे अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर आहेत. तुळजापूर (१९.०१ टक्के),उमरगा (१७.२८ टक्के) आणि लोहारा (१५.६३ टक्के) या तालुक्यांनीही समाधानकारक प्रगती केली आहे. मात्र धाराशिव (१०.४४ टक्के) आणि कळंब (६.२२ टक्के) तालुक्यांमध्ये प्रगती वाढविण्याची आवश्यकता आहे.

ई-पीक पाहणी ही केवळ ऑनलाइन नोंद नसून शेतकऱ्यांच्या शेतीचा अधिकृत डिजिटल पुरावा आहे. शेतात कोणते पीक घेतले आहे, किती क्षेत्रावर लागवड झाली आहे, याची अधिकृत माहिती शासनाकडे उपलब्ध होत असल्याने पीक विमा, नैसर्गिक आपत्तीतील नुकसानभरपाई,विविध कृषी अनुदाने,कर्जसवलत,आर्थिक मदत तसेच भविष्यातील कृषी नियोजनासाठी ही माहिती अत्यंत महत्त्वाची ठरते.त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या शेताची ई-पीक पाहणी वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे.

महसूल आणि कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना ई-पीक पाहणीबाबत सहकार्य करण्याचे आवाहन केले असून,उर्वरित क्षेत्राची नोंद लवकर पूर्ण करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.वेळेत ई-पीक पाहणी पूर्ण झाल्यास शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळविताना कोणतीही अडचण येणार नाही,तसेच जिल्ह्यातील कृषी क्षेत्राची अचूक माहिती शासनाकडे उपलब्ध होऊन भविष्यातील कृषी धोरणे अधिक प्रभावीपणे आखण्यास मदत होणार आहे.

## धाराशिवमध्ये २८ राजमाता जिजाऊ बस दाखल:प्रवास होणार सुखकर, प्रत्येक आगाराला मिळणार ५ बसेस



धाराशिव (शहर प्रतिनिधी शेख अंजुम)- जिल्ह्यातील जुन्या व खटारा बसेसमुळे वैतागलेल्या प्रवाशांना आता काहीअंशी दिलासा मिळणार आहे. एसटीच्या ताफ्यात नुकत्याच २८ नव्याकोऱ्या 'राजमाता जिजाऊ' बसेस दाखल झाल्या आहेत. या नव्या गाड्यांमुळे प्रवाशांची होणारी गैरसोय टळणार असून, याचा शेतकरी, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही याचा फायदा होणार आहे.

एसटी महामंडळाच्या धाराशिव विभागात सुमारे ४५० बसेस प्रवाशांच्या सेवेत नियमित विविध मार्गावर धावत आहेत. मात्र, यातील बहुतांश बसेस जुन्या असल्याने बसेसमध्ये बिघाड होण्याचे प्रमाणही वाढले आहे. त्यामुळे प्रवाशांना नेहमीच गैरसोयीचा सामना करावा लागतो. गेल्या काही महिन्यांपासून वाढती प्रवासी संख्या आणि गाड्यांची कमतरतेमुळे अनेक मार्गांवर प्रवाशांना ताटकळत उभे राहावे लागत होते. विशेषतः ग्रामीण भागातून शहरात येणाऱ्या विद्यार्थ्यांची आणि नोकरदारांची मोठी कोंडी होत होती. एसटीच्या ताफ्यात २८ नव्या 'राजमाता जिजाऊ' बसेस दाखल झाल्याने बसेसची संख्या पावणे पाचशेच्यावर गेली आहे. प्रत्येक आगाराला ५ बसेस देण्याचे नियोजन विभागाने केले आहे. या गाड्यांमुळे लांब पल्ल्याच्या आणि महत्त्वाच्या मध्यम पल्ल्याच्या मार्गांवरील फेऱ्या वाढवणे प्रशासनाला शक्य होणार आहे.

खा. राजेनिंबाळकर यांच्या हस्ते बसेसचे लोकार्पण धाराशिव विभागाच्या ताफ्यात दाखल झालेल्या जिजाऊ बसेसचे लोकार्पण खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळर यांच्या हस्ते रविवारी धाराशिव बसस्थानकात झाले. या वेळी विभाग नियंत्रक अजय पाटील यांच्यासह कर्मचारीही उपस्थित होते.

## अभ्यासक्रम अर्धवट सोडल्यास शिष्यवृत्ती नाही; अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी प्रवेशापूर्वी घ्यावी काळजी

धाराशिव दि.६ जुलै (जिमाका) उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेताना घाईगडबडीत किंवा तात्पुरत्या स्वरूपात एका अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊन नंतर तो अर्धवट सोडून दुसऱ्या अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहावे लागू शकते.महाडीबीटी (MahaDBT) पोर्टलवरील तांत्रिक तरतुदी आणि संबंधित शासन निर्णयातील निकषांमुळे अशा विद्यार्थ्यांचे नव्याने घेतलेल्या अभ्यासक्रमासाठीचे शिष्यवृत्ती अर्ज अपात्र ठरतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताना योग्य निर्णय घ्यावा,असे आवाहन सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण, धाराशिव श्री.सचिन कवले यांनी केले आहे.

बारावीनंतर अनेक विद्यार्थी वैद्यकीय,अभियांत्रिकी,फार्मसी, कृषी आदी व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी प्रयत्न करतात. मात्र,अपेक्षित अभ्यासक्रमात किंवा महाविद्यालयात तत्काळ प्रवेश न मिळाल्यास तसेच शैक्षणिक 'गॅप' टाळण्यासाठी अनेक विद्यार्थी तात्पुरत्या स्वरूपात बीए,बीएससी किंवा बीकॉमसारख्या बिगर- व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतात.या प्रवेशानंतर ते महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करून त्याचा लाभही घेतात.

मात्र,पुढील शैक्षणिक वर्षात अपेक्षित व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश मिळाल्यानंतर ते पूर्वीचा अभ्यासक्रम अर्धवट सोडतात.अशा वेळी महाडीबीटी पोर्टलवरील तांत्रिक तरतुदी आणि शासन निर्णयातील नियमांनुसार त्यांना नव्या अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्तीचा लाभ मिळत नाही.

याबाबतचा नियम स्पष्ट करताना प्रशासनाने नमूद केले आहे की, महाडीबीटी पोर्टलवरील तांत्रिक तरतुदीनुसार व संबंधित शासन निर्णयातील विहित केलेल्या निकषांनुसार एखाद्या अभ्यासक्रमास प्रवेश घेऊन त्याकरिताच्या शिष्यवृत्तीचा लाभ घेऊन सदर अभ्यासक्रम अर्धवट सोडून कोणत्याही अभ्यासक्रमास नव्याने प्रवेश घेतला तरी देखील अशा विद्यार्थ्यांचा नव्याने घेतलेल्या अभ्यासक्रमाकरिता शिष्यवृत्तीचा अर्ज अपात्र होऊन त्यास कोणत्याही प्रकारच्या शिष्यवृत्तीचा लाभ घेता येत नाही.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान टाळण्यासाठी महाविद्यालयांनी प्रवेश प्रक्रियेदरम्यान अशा विद्यार्थ्यांचे समुपदेशन करावे.तसेच या नियमांची माहिती महाविद्यालयाच्या सूचना फलकावर,महाविद्यालयाच्या डिजिटल सोशल मीडिया समूहांमध्ये आणि शिष्यवृत्ती विभागाबाहेर ठळकपणे प्रसिद्ध करावी,अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत.

याशिवाय शिष्यवृत्तीची रक्कम ही राज्य शासन व केंद्र शासनाकडून डीबीटी (ऊइढ) प्रणालीद्वारे थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते.या पद्धतीने विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा झालेली रक्कम शासनाकडे चलनाद्वारे परत करण्याबाबत कोणतेही वित्तीय नियम प्रचलित नाहीत.त्यामुळे शासनाची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम शासनास परत करण्याबाबत कोणतेही मार्गदर्शन महाविद्यालय स्तरावरून करू नये, असेही श्री.सचिन कवले यांनी स्पष्ट केले आहे.

विद्यार्थ्यांनी प्रवेशाचा अंतिम निर्णय घेताना शिष्यवृत्तीच्या नियमांची सखोल माहिती करून घेणे आवश्यक असून,महाविद्यालयांनीही याबाबत व्यापक जनजागृती करून विद्यार्थ्यांचे संभाव्य शैक्षणिक आणि आर्थिक नुकसान टाळण्यासाठी पुढाकार घ्यावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

## महास्ट्राईड अंतर्गत कंत्राटी मनुष्यबळाची ८ जुलैची मुलाखत रद्द

धाराशिव (जिमाका)ि-जल्हा प्रशासनास तांत्रिक सहकार्य आणि धोरणात्मक मार्गदर्शन मिळावे,यासाठी जिल्हा धोरण अंमलबजावणी कक्ष (DSU) स्थापन करण्यात येत असून,या कक्षासाठी उच्च शैक्षणिक पात्रता व अनुभव असलेल्या तज्ज्ञांची कंत्राटी पद्धतीने नियुक्ती केली जाणार आहे.या भरती प्रक्रियेतील कंत्राटी मनुष्यबळ पदांसाठी मुलाखतीबाबत यापूर्वी जिल्हा प्रशासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धी देण्यात आली होती.

मात्र,काही प्रशासकीय कारणास्तव ८ जुलै २०२६ रोजी होणारी मुलाखत रद्द करण्यात आल्याचे संबंधित उमेदवारांनी याची नोंद घ्यावी,तसेच,पुढील मुलाखतीची तारीख व वेळ लवकरच जिल्हा प्रशासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर https://dharashiv.maharashtra.gov.in प्रसिद्ध करण्यात येणार असल्याने उमेदवारांनी संकेतस्थळावरील अद्ययावत माहितीकडे नियमित लक्ष ठेवावे,असे जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे यांनी कळविले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## सत्तेसाठीचे समिकरण..

राज्यात आता केवळ सत्तेसाठी समिकरण जुळवुन घेतले जात आहे. राजकारणी मंडळी सत्तेपासून दूर राहु शकत नाही हे सत्य आहे. त्यामुळे सत्ता हवी असेल तर सत्ताधारी मंडळीकडे आकर्षित व्हावे लागेल. त्या शिवाय पर्याय दिसून येत नाही. मुळात सध्याला निष्ठा वगैरे दिसून येत नाही. राजकारण सत्य नसते हे जुनी मंडळी म्हणते ते काही चुकीचे नाही. त्यामुळे आता पक्ष बदलाचे प्रमाण वाढले आहे, आणखीन वाढणार आहे हे लक्षात घेतले पाहिजे. राज्यात एका चुकीचा परिणाम किती जनतेला भोगावा लागत आहे. भाजपा व सेना एकत्र राहीली असती. थोडा स्वार्थ बाजूला ठेवला असता तर आज जी परिस्थिती दिसून येते ती दिसून आली नसती. आज शिवसेना दोन झाल्या तशा राष्ट्रवादी दोन झाल्या. काँग्रेसमध्ये काय उरले आहे? एक तर मजबुत असा प्रांतिय अध्यक्ष नाही. राजकारणात एके काळी राज्यभर काँग्रेसची पकड होती ती दिसून येत नाही. अतिषय कमी आमदार निवडूण आणता आले. आले ते केवळ स्वबळावर आले. जशी लातूरची जागा देशमुख परिवाराच्या लोकप्रियतेमुळे आली. बाकी भाजपाचे वाढते आमदारांची संख्या विचार करायाला लावणारी आहे. एक काळ असा होता. लातूर हा डाव्यांचा नंतर काँग्रेसचा बाले किल्ला समजला जाणारा आज भाजपाचे सर्वाधिक आमदार आहेत. राज्यात भाजपा सोडली तर कोणत्याही पक्षाला सत्ता मिळविता आली नाही. राज्यातील जनता सर्वाधिक शिवसेनेला मानणारी आहे. मुंबई ही शिवसेना हिदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची आजही समजली जाते. यावर ठाकरे परिवाराची पकड ढिली झाल्याने एकनाथ शिंदे यांच्या ताब्यात गेली. एकनाथ शिंदे हे कट्टर शिवसैनिक समजले जातात. आजही त्यांनी भाजपात न जाता आपले वेगळे आस्तित्त्व निर्माण केले आहे. आज एकनाथ शिंदे यांची शिवसेना दोन नंबरची समजली जात आहे. हे उद्धव ठाकरे परिवारास दिसून येत नाही का? मुळात आपल्या राज्यात सत्तेसाठी राजकारण खेळत आहेत त्यामुळे मुळ प्रश्न बाजूला राहीले जात आहेत. मुळ प्रश्नाची उकल होत नाही. हे लक्षात घेतले पाहिजे. राज्यात अजूनही प्रत्यक्षात शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला नाही. याद्या तयार करणे. चौकशी आदि प्रकार चालू आहेत. केवळ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहिण योजना चालू की, तीचा प्रत्यक्षात लाभ मिळाला. नंतर यालाही कात्री लावली. केवासी आदि प्रकार लागू केले. प्रत्यक्षात थेट खात्यात दिड हजार रूपये जमा झाले ही एक यशस्वीपना दिसून आला. बाकी केवळ घोषणा करताना दिसून येतात. प्रत्यक्षात योजना पदरात पडत नाही तो पर्यंत यशस्वी कसे म्हणायाचे हेच लक्षात येत नाही. त्यामुळे राज्यात आजही कोण समाधानी आहे याचा शोध व विचार करावा लागतो आहे. राज्यात अनेक अशा योजनाची घोषणा केली जाते. प्रत्यक्षात हाती लागत नाही ही एक वस्तूस्थिती आहे. मुळात भाजपाला मोठे यश मिळत हे विरोधपक्षाच्या अकार्यक्षमामुळे मिळते! हे कोठेतरी मान्यच केले पाहिजे. देशात आता विचार केला तर केंद्रात भाजपा व मित्र पक्षमिळून तीनशेचा आकडा सहज पार केला आहे. यापुढे सहज चारशे पर्यंत हा आकडा प्राप्त करू शकतात. सध्याला दुरदृष्टिमुळे शिंदे गटातची संख्यात्मक वाढ झाली यावरून ममता बॅनर्जी यांची तृलमुल काँग्रेसचा एक मोठा गट वेगळा झाला. तसा विचार केला तर ज्यांना भाजपामध्ये समाविष्ठ होता येणार नाही त्यांनी मित्र पक्षात जाणून एनडीएची ताकद वाढवावी असेचा संदेश दिल्याचे दिसून येते. राज्यात मान्सूनचे आगमन वेळेवर झाले नाही. एक महिण्यानंतर मान्सून बसरत आहे. ही बाब सर्वांना माहिती आहे. अमेरिका इराण दरम्यान युद्धामुळे महागाई वाढली आहे. इंधनाचे दर वाढले आहे. याचा परिणाम देशातील जनतेला महागाई सहन करावा लागत आहे. अशा स्थितीत राज्यातील परिस्थितीकडे अधिक लक्ष देण्यापेक्षा सत्ताधाऱ्यात इनकमिंग चालू आहे तर विरोधकांचे शिव्या घालणे. नको ते बोलणे, टाकून बोलणे चालु असल्याचे चित्र दिसून येत आहे. विरोकांची ताकद वाढत नाही ही लोकशाहीची ताकद कमी होताना दिसून येत आहे ही एक घातक बाब ठरू शकते. भारत हा देश लोकशाही प्रधान देश आहे. लोकशाहीत सत्ताधाऱ्यापेक्षा विरोधकांना महत्त्व असते असे राज्यशास्त्रच शिकविते. त्यामुळे विरोधकात एकी नाही याचा परिणाम सत्ताधाऱ्यांना पोषक होताना दिसून येत आहे का? राज्यात सध्याला एक बाब लक्षात येत ती म्हणजे आम्ही सत्ताधाऱ्यांकडे जाणार. पक्ष बदलणार. ही एक विरोधीपक्ष प्रमुखांना भीती दाखविली जाते हे योग्य नाही. उद्धव ठाकरे यांचे खासदार फुटले ते दुसऱ्या शिवसेनेत गेल्याने आता आम्ही पक्षांतर करू किंवा पक्ष बदलू अशी धमकी दिली जात आहे. अशा धमकीला विरोधक घाबरत आहे. तसे पाहिले तर राज्यातील विरोधकात काय शिल्लक आहे? राज्यातील विरोधकांची ताकद शह देण्यासाठी कमी पडत आहे. हे उघड दिसून येत आहे. प्रमुख पक्षनेते सत्तेत आहेत. त्यांचा प्रमुख भाजपा हा देशात मजबुत दिसून येत आहे. आगामी ज्या राज्यात विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत, तेथे सत्ताधाऱ्याची स्थिती मजबुत आहे. समाजवादी पक्ष असो किंवा बसपा असो त्याची ताकद कमी होताना दिसून येते. देशात काँग्रेसची स्थिती कशी आहे हे देशातील जनतेला कळून आले आहे. राज्यात विनोद तावडे व राष्ट्रवादीचे जयंत पाटील यांच्या गुप्त बैठकाचा अंदाज वरून पुन्हा राज्यात राजकिय भुकंपाची शक्यता वर्तवली जात आहे. असे एका मागून एक राजकिय भुकंपाची स्थिती पाहाता राज्यात विरोधशिवाय सर्व काही चालते असेच दिसून येत आहे. राज्यात विरोधीपक्ष नेतेपद नाही. वास्तविक हे राजकिय सत्तेत आहेत यांना विरोधक नको की, काय अशी परिस्थिती दिसून येत आहे. मातब्बर नेते मंडळी जी विरोधक म्हणून जनतेची बाजू घेणारी तीच सत्तेत सहभागी होणार असेल तर ते योग्य नाही. सरकारवर अंकुश ठेवणारे असले पाहिजे तरच लोकशाही मजबुत, सदृढ होवू शकते. जो-तो सत्तेत जाण्यासाठी उत्स्युक असेल तर जनतेचे काय होणार? या बाबत चिंतन होणे आता अपेक्षित आहे असे वाटू लागले आहे. राज्यात पेरण्या लांबविवर पडल्या आहेत. अजून कर्जमाफीचा लाभ शेतकऱ्याच्या खात्यात जमा नाही. विमा तर कोठे विरगळून गेला हे कळून आले नाही. विरोधक म्हणून कोणती जबाबदारी पार पाडत आहेत हे कळून येत नाही. केवळ पक्षांतर, सत्तेत जाण्याची ओढ दिसून येत आहे हे लोकशाहीला मारक ठरणारी बाब आहे यावर चिंतन अपेक्षित आहे.

# कर्जमुक्तीमुळे मराठवाड्यातील शेतीला मिळणार नवी उभारी




शेतकरी समृद्ध तर राज्य समृद्ध ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' जाहीर केली आहे. कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देऊन त्यांना नव्याने शेती करण्यासाठी सक्षम करणे आणि कृषी क्षेत्राला नवी ऊर्जा देणे हा या योजनेमागील मूलभूत उद्देश आहे.

मराठवाडा हा दुष्काळ, अवर्षण, अतिवृष्टी आणि हवामान बदलाच्या सततच्या संकटांना सामोरा जाणारा प्रदेश आहे. अनियमित पाऊस, वाढता उत्पादन खर्च, बाजारभावातील चढ-उतार आणि नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत. या पार्श्वभूमीवर शासनाने राबविलेली ही कर्जमुक्ती योजना मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी मोठा आधार ठरणार आहे.

योजनेअंतर्गत पात्र थकबाकीदार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतच्या अल्पमुदतीच्या पीककर्जाची कर्जमुक्ती दिली जाणार आहे. तसेच दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठी एकवेळ समझोता (ओटीएस) योजना राबविण्यात येणार आहे. त्यामुळे मोठ्या थकबाकीमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांनाही दिलासा मिळणार आहे.

या योजनेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही न्याय देण्यात आला आहे. वेळेवर कर्जफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. त्यामुळे प्रामाणिक कर्जफेडीला प्रोत्साहन मिळेल आणि आर्थिक शिस्तही वाढीस लागेल.

जुलै २०२६ च्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. पहिल्या टप्प्यात थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) पद्धतीने रक्कम वितरित केली जाईल. त्यामुळे लाभार्थ्यांना कोणत्याही मध्यस्थाशिवाय थेट लाभ मिळणार आहे.

योजनेची अंमलबजावणी पारदर्शक आणि प्रभावी व्हावी यासाठी राज्यभरात आवश्यक प्रक्रिया वेगाने सुरू आहे. मराठवाड्यातील आपले सरकार सेवा केंद्र (सीएससी) आणि महा-ई-सेवा केंद्रांवर पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण सुरू आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांकडून पात्र कर्जदारांची माहिती शासनाच्या अधिकृत पोर्टलवर अपलोड करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

या योजनेचा लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी काही बाबींची काळजी घेणे आवश्यक आहे. आधार कार्ड बँक खात्याशी संलग्न असणे, केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे, सीएससी केंद्रावर बायोमेट्रिक प्रमाणीकरण करून त्याची पावती जपून ठेवणे या बाबी वेळेत पूर्ण केल्यास लाभ मिळण्यास कोणतीही अडचण येणार नाही.

योजनेचा लाभ १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदतीच्या पीककर्जासाठी लागू आहे. संबंधित कर्ज ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असावे आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड झालेली नसावी. या निकषांची पूर्तता करणारे पात्र शेतकरी कर्जमुक्तीसाठी पात्र ठरणार आहेत.

या योजनेचा लाभ छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, लातूर, नांदेड, धाराशिव आणि हिंगोली या मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांतील पात्र शेतकऱ्यांना मिळणार आहे.

कर्जमुक्तीमुळे शेतकरी पुन्हा नव्याने पीककर्ज घेऊ शकतील, आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करू शकतील आणि शेतीमध्ये अधिक गुंतवणूक करण्याचा आत्मविश्वास मिळवू शकतील.

कर्जमुक्ती ही केवळ आर्थिक मदत नसून शेतकऱ्यांच्या आत्मविश्वासाला नवी उभारी देणारे पाऊल आहे. शासनाच्या या निर्णयामुळे मराठवाड्यातील हजारो कुटुंबांना दिलासा मिळेल, शेतीची उत्पादकता वाढेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी चालना मिळेल. शेतकरी सक्षम झाला तरच कृषी क्षेत्र सक्षम होईल आणि कृषी क्षेत्र सक्षम झाले तर राज्याच्या विकासाला अधिक बळ मिळेल. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ ही त्या दिशेने उचललेले एक महत्त्वपूर्ण आणि दूरदृष्टीचे पाऊल ठरणार आहे.

**संकलन**

**- विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**

# अवैध गौण खनिज उत्खनन रोखण्यासाठी नवीन नियमावली लवकरच- महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील अवैध गौण खनिज उत्खननावर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी व्यापक धोरणात्मक उपाययोजना राबविण्यात येत असून, राज्यभर टप्प्याटप्प्याने ईटीएस (Electronic Total Station) सर्वेक्षण, ड्रोन सर्वे क्षण, अत्याधुनिक मॉनिटरिंग व्यवस्था, कायद्यात सुधारणा आणि नवीन नियमावली आणण्यात येणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना दिली.

विधानसभा सदस्य सुनील प्रभु यांच्या मांडलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना महसूल मंत्री बावनकुळे बोलत होते. या लक्षवेधीदरम्यान सदस्य सुधीर मुनगंटीवार, अर्जुन खोतकर, राजू तोडसाम, राजू खरे, भास्कर जाधव, प्रविण दटके यांनीही सहभाग नोंदविला.

पालघर जिल्ह्यातील विरार येथील खाण प्रकरणाचा उल्लेख करताना महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, पोर्टलवर प्राप्त झालेल्या तक्रारीची दखल घेऊन मंडळ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी तपासणी केली होती. त्यावेळी झालेल्या वादातून घडलेल्या हत्येप्रकरणी नऊ आरोपींपैकी आठ आरोपींना अटक करण्यात आली असून एक आरोपी फरार आहे. या प्रकरणात गंभीर स्वरूपाची विविध कलमे तसेच संघटित गुन्हेगारीशी संबंधित तरतुदी लागू करण्यात आल्या आहेत. राज्य मानवी हक्क आयोगाकडे दाखल दाव्याचीही दखल घेण्यात आली असून संबंधित खाण व क्रशर बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या प्रकरणात ईटीएस मोजणीद्वारे ४,९२२ ब्रास उत्खनन झाल्याचे निष्पन्न झाले असून त्याबाबतचा अहवाल उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.





राज्यातील मागील अनेक वर्षांतील अवैध उत्खननाची वस्तुस्थिती समोर आणण्यासाठी संपूर्ण राज्याचे ईटीएस सर्वेक्षण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. रेलटेल कंपनीच्या माध्यमातून गौण खनिजांच्या देखरेखीसाठी कोकण विभागीय आयुक्तालयाच्या अधिपत्याखाली अत्याधुनिक वॉर रूम उभारण्यात येत असून, त्याद्वारे राज्यातील उत्खननावर सातत्याने देखरेख ठेवली जाणार आहे.

रायगड, पालघर, ठाणे, नवी मुंबई, रत्नागिरी यांसारख्या संवेदनशील भागांना प्राधान्य देत पुढील सहा महिन्यांत विविध संस्थांचे पॅनेल तयार करून ईटीएस व ड्रोन सर्वेक्षण सुरू करण्यात येईल. त्यानंतर पुणे, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर तसेच इतर उत्खननग्रस्त जिल्ह्यांमध्येही सर्वे क्षण करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

गौण खनिज नियमावली व कायद्यातील व्यापक सुधारणा करण्यासाठी विधानसभा सदस्यांची समिती स्थापन करण्यात येणार असून, समितीच्या शिफारशींनुसार डिसेंबर अधिवेशनात सुधारित नियमावली व कायद्यातील बदल सभागृहात मांडले जातील. अपील दाखल करण्यासाठी भरावयाच्या रकमेच्या अटींसह विविध सूचनांचाही समितीमार्फत विचार करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

गौण खनिजांच्या अवैध उत्खननावर प्रभावी नियंत्रण, महसुलातील गळती रोखणे आणि पारदर्शक व जबाबदार व्यवस्था निर्माण करणे ही शासनाची भूमिका असून त्यासाठी आवश्यक सर्व कायदेशीर व प्रशासकीय उपाययोजना करण्यात येतील, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

# किडनीचे बिघडल्याचे सामान्य लक्षणे



किडनीच्या आजारांमध्ये सामान्यतः थकवा येणे, लघवीच्या प्रमाणात बदल होणे (कमी किंवा जास्त होणे), पाय आणि घोट्याला सूज येणे, मळमळणे, त्वचा कोरडी पडणे आणि श्वास घ्यायला त्रास होणे यांसारखी मुख्य लक्षणे दिसून येतात. किडनी खराब होत असल्याची प्रमुख लक्षणे खालीलप्रमाणे आहेत:लघवीमध्ये बदल: लघवीच्या रंगात बदल होणे, फेस येणे, किंवा लघवी करताना वेदना होणे.

सूज येणे: शरीरात पाणी साठल्यामुळे पाय, घोटे, किंवा चेहऱ्यावर सूज येणे.सतत थकवा: किडनी योग्यरित्या रक्त गाळत नसल्याने विषारी पदार्थ शरीरात साठतात, ज्यामुळे सतत थकवा जाणवतो आणि लक्ष केंद्रित करण्यात अडचण येते.त्वचेला खाज सुटणे: रक्तातील खनिजे आणि पौष्टिक घटकांचा समतोल बिघडल्यामुळे त्वचेवर खाज सुटणे.मळमळ आणि उलट्या: भूक न लागणे, मळमळणे किंवा खाल्लेले न पचणे. ही लक्षणे दिसल्यास पुण्यातील नामांकित हॉस्पिटल अथवा तज्ज्ञ मूत्रपिंड तज्ज्ञांकडून त्वरित तपासणी करून घ्या.

# उपदेशकथा
## लागलेले व्यसन



एकदा एका गांधीभक्तानं गांधीजींकडे सिगरेटच्या पाकिटावरचं एक लेबलच मुद्दाम पाठवलं. त्याच्यावर छापलं होतं, गांधीजींचं चित्र अन् त्या सिगरेटला नाव दिलं होतं, 'महात्मा गांधी सिगरेट'. आपल्या नावाचा तो दुरुपयोग बघून गांधीजींना अतिशय वाईट वाटलं. ते म्हणाले, 'माझ्या नावाने अनेक दुरुपयोग आहेतच झा-लेले पण जाणूनबुजून सिगरेटशी माझं नाव जोडून जितका अपमान झालाय माझा, तितका दुसऱ्या कशानंही झालेला नाही ! गोष्ट अशी आहे की, मला स्वत:ला तर दारुइतकंच धूम्रपानही भयानक वाटतं कारण धूम्रपान करणं ही एक अगदी घाणेरडी सवय आहे असंच माझं ठाम मत आहे. कारण असं की, या धूम्रपानामुळे माणसाचं अंत:करण मरून जातं आणि तसं होणं हे तर दारूहून वाईट कारण त्याचा दुष्परिणाम लगेच काही दिसून येत नाही आणि दुसरे म्हणजे ही अशी सवय आहे की ती एकदा जडली की मग सुटता सुटत नाही तसंच ती खर्चिकही आहे फार. आणखी असं की, बिडी सिगरेट पिणाऱ्यांच्या श्वासाला पण घाण वास येतो. त्याच्या दातांचा रंगही बिघडतो. पुढे पुढे तर त्यानं कॅन्सरही होतो. कॅन्सर किती घातक हे आता कुणाला सांगायला नको ! गांधीजी पुढे म्हणाले, ज्यानं कोणी माझं नाव सिगरेटला दिलं त्यानं त्यासाठी माझी अनुमती काही घेतलेली नाही. जर या व्यापाऱ्यानं ही नावाची लेबल बाजारातून परत घेतली किंवा लोकांनी ही पाकिटे विकत घ्यायचीच नाहीत असं ठरवलं तर मी लोकांचा फार आभारी होईन.

कथा उपदेश : बिडी-सिगरेटचं व्यसन फार घातक आहे. ते लावून घेऊ नये.

# शेतकऱ्यांनी हवामानाच्या स्थितीनुसार नियोजन करावे

*८ जुलैपासून राज्यातील बहुतांश भागांमध्ये पावसात घट*

**मुंबई/प्रतिनिधी :** जुलैच्या सुरुवातीला मुंबईसह पश्चिम महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली असली तरी राज्यातील विविध भागांमध्ये आतापर्यंत सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे, विशेषतः खानदेश (धुळे आणि नंदुरबार जिल्हे), मध्य महाराष्ट्र (अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्हे), पश्चिम विदर्भ आणि मराठवाड्यातील काही भागाचा यामध्ये समावेश आहे. ८ जुलैपासून राज्यातील बहुतांश भागांमध्ये पावसाच्या प्रमाणात लक्षणीय घट होण्याचा अंदाज असून, ही परिस्थिती किमान पुढील १० दिवस कायम राहण्याची शक्यता आहे.

या दरम्यान राज्यातील विविध भागांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस अपेक्षित आहे. तसेच, राज्यातील कमाल तापमानात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्राथमिक अंदाजानुसार जुलै महिन्याच्या उत्तरार्धात पूर्वार्धाच्या तुलनेत पावसाचे प्रमाण कमी राहू शकते.

शेतकऱ्यांनी हवामानाच्या या स्थितीनुसार शेतीचे नियोजन करावे. ऋराज्यातील ज्या भागांमध्ये अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही, तिथे शेतकऱ्यांनी जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये, असे आवाहन राज्याच्या कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

# प्रभागातील विकास कामांना मिळणार गती - स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले

**लातूर/प्रतिनिधी:** प्रभागातील जनतेच्या हितासाठी आवश्यक असणारी विकास कामे करण्यासाठी प्रत्यके सदस्यांना हक्काचा विकास निधी देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याचे सांगून या निर्णयामुळे प्रभागातील विकास कामांना गती मिळणार आहे अशी माहिती स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांनी दिली आहे. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या सुचने नुसार हा निर्णय घेण्यात आला असून मुंबई महापालीकेच्या धर्तीवर असा निर्णय घेणारी लातूर शहर महानगरपालिका राज्यात दुसरी असल्याचे सचिन बंडापल्ले यांनी यावेळी सांगीतले.

महानगर पालिकेच्या स्थायी समितीची बैठक आज सभापती सचिन बंडापल्ले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. याबैठकीत विविध सहा विषयांवर विचार विनिमय करुन निर्णय घेण्यात आला. यामध्ये सर्वात महत्वाचा निर्णय म्हणजे प्रभागातील विकास कामांना गती देण्याबाबत घेण्यात आला. जनतेच्या हितासाठी आपापल्या प्रभागातील जी विकास कामे सुचवली आहेत. ती विकास कामे पूर्ण होण्याकरीता नगरसेवकांना प्रत्येकी १२ लक्ष ५० हजार रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे नगरसेवकांना आता विकास कामे पूर्ण करण्यात कोणतीच अडचण येणार नसुन

## स्थायी समितीच्या निर्णयाने नगरसेवकांना मिळणार निधी



यामाध्यमातून लातूरकरांना दिलासा मिळणार आहे.या विषयासोबतच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७५ फुटी पुतळा उभारणी बाबत विचार विनिमय करुन सदर पुतळा कसा असावा व परिसराचे सुशोभिकरण कसे असावे याकरीता सदस्यांचा हैद्राबाद येथे अभ्यासदौरा करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. याबैठकीत मनपाचे पदाधिकारी व अधिकारी यांना वाहन पुरवठा करणे यासह सामान्य प्रशासन विभागात मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे आणि विविध कामांबाबत अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा होऊन बैठक पार पडली.

तत्पूर्वी सदस्यांनी ज्या विविध सुचना केल्या आहेत त्याबाबत संबंधीत विभागांनी आवश्यक असणारी कार्यवाही करावी अशी सुचना सभापती बंडापल्ले यांनी दिली. या बैठकीस सदस्य अॅड. दिपक सुळ, रविशंकर जाधव, अहमदखॉ पठाण, स्वाती घोरपडे, अॅड. मनोज थोरात, विकास कांबळे, गिरीश ब्याळे, ज्योती आवस्कर , निकीता सोमवंशी, अॅड. अतिष चिकटे, इसरार सगरे, अदिती पाटील कव्हेकर अनंत गायकवाड,बाळासाहेब देशमुख, पवन सोलंकर यांच्यासह आयुक्त राहूल कुलकर्णी, अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त वसुधा फड, पंजाब खानसुळे यांच्या सह विविध विभाग प्रमुख व अधिकारी उपस्थित होते.

आर ओ प्लांट साठी नाहरकत प्रमाण पत्र बंधनकारक करावे.शहराच्या विविध भांगामध्ये शुद्ध पाणी पुरवठ्याच्या नावाखाली अनेक आर ओ प्लांट सुरु आहेत. या पैकी काही प्लांटच्या माध्यमातून अस्वच्छ व अशुध पाणी पुरवठा होत असल्याच्या तक्रारी आल्या आहेत, त्यामुळे शहरातील सर्व आर ओ प्लांटची तात्काळ तपासणी करण्याचे आदेश सभापती सचिन बंडापल्ले यांनी दिले आहेत. तसेच या प्लांट साठी मनपाचे ना हरकत प्रमाणपत्र बंधनकारक करण्याच्या सुचनाही देण्यात आल्या आहेत. या बैठकीच्या वेळी शहरातील व्यवसायीक, खाजगी, निवासी इमारती व शैक्षणिक संकुलामध्ये अग्निशामक प्रतिबंधक यंत्रणा तपासणीचे आदेश यापूर्वीच दिले असल्याने या बाबतचा आढावा अग्निशमन विभागाकडून घेण्यात आला. तसेच याबाबत कोणतीही दिरंगाई होणार नाही याची खबरदारी घेण्याच्या सुचना देण्यात आल्या

# राज्यातील खाजगी शिकवणी व सावकारी तात्काळ बंद करावी : संजयभाऊ कांबळे




**लातूर/प्रतिनिधी:** महाराष्ट्रातील खाजगी शिकवणी वर्ग आणि खाजगी फायनान्स व सावकारी तात्काळ बंद करण्यात यावेत,अशी मागणी भारतीय दलित पँथरचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष संजयभाऊ कांबळे यांनी एका लेखी निवेदनाद्वारे मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. तत्पूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शनेही करण्यात आली.

लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनात संजयभाऊ कांबळे यांनी पुढे असे नमूद केले आहे की, नीट पेपर फुटी प्रकरणाने देशभरात खळब माजली आहे. अकरावी - बारावीचे शिक्षण हे केवळ अनुदानापुरते मर्यादित राहिले आहे.

कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक पद्धत नसल्याने सर्व महाविद्यालयातीलप्राध्यापकाच्या संमतीने सर्व विद्यार्थी खाजगी क्लासेस मध्ये मोठ्या प्रमाणात फीस भरून शिक्षण घेत आहेत. गरिबांच्या विद्यार्थ्यांना फीस भरून खाजगी कोचिंग क्लासेस मध्ये शिक्षण घेणे परवडत नसल्याने आणि महाविद्यालयात प्राध्यापक शिकवत नसल्याने गरिबांचे शिक्षण राहिलेच नाही, ही बाब गंभीर असून शासनाने याची तात्काळ दखल घेऊन महाराष्ट्रातील सर्व खाजगी कोचिंग क्लासेस बंद करावेत आणि महाविद्यालयातील अकरावी बारावीचे शिक्षण प्रत्यक्षात कॉलेजमध्ये घेण्याचे सक्तीचे करून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक पद्धत अवलंब करण्याचे आदेश द्यावेत.

तसेच लातूर जिल्ह्यातील नणंद गावच्या शेतकऱ्यांची सावकारांनी मोठ्या प्रमाणात पिळवणूक केल्याचे उघड झाले असून असे अनेक प्रकार लातूर जिल्ह्यात घडले आहेत व दैनंदिन घडत आहेत. फायनान्सवाले आणि खाजगी सावकार यांच्या दहशतीमुळे पुढे येण्यास कोणी धजत नसून त्यांनी लातूर जिल्ह्यामध्ये दहशत निर्माण केली आहे. ग्रामीण व शहरी भागातील मजबूर लोकांचा फायदा घेऊन त्यांचा मोठ्या प्रमाणात पिळवणूक करीत आहेत. त्यांची प्रचंड दहशत असल्याने लोक समोर येण्यास तयार नाहीत, मात्र आत्महत्या करण्यास तयार असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणे लातूर जिल्ह्यातील १२ शासकीय धान्य गोदामामध्ये हमाली करणाऱ्या हमालांचे बनावट रेकॉर्ड तयार करून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार करणाऱ्या संबंधित कंत्राटदाराची एसआयटीमार्फत चौकशी करून त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी,अशी मागणी त्यांनी केली आहे.

यावेळी संजयभाऊ कांबळे यांच्यासह धम्मानंद घोडके, संग्राम कदम, सतीश मादळे, नितीन कांबळे, राजू कांबळे दावणगावकर , सायस पाडुळे, केतन कांबळे, प्रकाश सूर्यवंशी, रमेश पाडुळे, राम सावते , दिलीप साबळे, सुभाष हुलसुरे, बब्रुवान भालेराव, देवानंद चिकाटे , प्रकाश सूर्यवंशी, अंकुश पाडुळे, कमलाकर साबळे, आत्माराम हुलसुरे यांची उपस्थिती होती.

# रोटरी क्लब लातूर मेट्रोच्या अध्यक्षपदी रो. विजय कोळी यांची निवड

**लातूर/प्रतिनिधी:** रोटरी क्लब लातूर मेट्रोचा २०२६-२७ या वर्षासाठीचा २६वा पदग्रहण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात आणि दिमाखात पार पडला. यावेळी रोटेरियन विजय कोळी यांनी अध्यक्षपदाची, मनोज सूर्यवंशी यांनी सचिवपदाची, तर दत्ता बेडके यांनी सह सचिवपदाची सूत्रे स्वीकारली.

समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर जयेशभाई पटेल व फर्स्ट लेडी पारुल जयेशभाई पटेल यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना रोटरीची पिन, कॉलर आणि पदभाराचे प्रतीकात्मक चार्टर प्रदान करून नवीन कार्यकारिणीचा पदभार सोपविण्यात आला.

यावेळी मावळते अध्यक्ष राहुल धरणे, सचिव नानासाहेब आगवाने आणि संयुक्त सचिव प्रवीण माने यांनी मागील वर्षात राबविण्यात आलेल्या विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य




व जनकल्याणकारी सेवा प्रकल्पांचा सविस्तर आढावा सादर केला.

समाजहिताच्या अनेक उपक्रमांमुळे क्लबने शहरात वेगळी ओळख निर्माण केल्याचे त्यांनी नमूद केले.नवनिर्वाचित अध्यक्ष विजय कोळी यांनी आगामी वर्षात आरोग्य शिबिरे, वृक्षारोपण, रक्तदान, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रम, पर्यावरण संवर्धन, महिला सक्षमीकरण आणि युवकांसाठी नेतृत्व विकास कार्यक्रम यांसारखे विविध समाजोपयोगी प्रकल्प राबविण्याचा मानस व्यक्त केला. तसेच क्लबची सदस्यसंख्या वाढविण्यावर भर देत, सात नवीन सदस्यांचे स्वागत करण्यात आले असून वर्षभरात आणखी १५ सदस्य वाढविण्याचा संकल्प त्यांनी जाहीर केला.यावेळी रो.रमाकांत बरूरे यांनी ७६ हजार रु.रोटरी फाऊंडेशनला देणगी स्वरुपात दिले.

समारंभात रोटरीच्या सेवा, मैत्री आणि सामाजिक बांधिलकीच्या मूल्यांचा पुनरुच्चार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी नवीन कार्यकारिणीला शुभेच्छा देत समाजहिताच्या कार्यात अधिक जोमाने योगदान देण्याचे आवाहन केले.कार्यक्रमास रोटरी क्लबचे पदाधिकारी, संचालक मंडळ, सदस्य, विविध क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. समारंभाचे सूत्रसंचालन कालिदास लांडगे यांनी केले तर आभार प्रदर्शन मनोज सुर्यवंशी यांनी व्यक्त केले.

नुतन अध्यक्ष विजय कोळी, सचिव मनोज सूर्यवंशी, संयुक्त सचिव दत्ता बेडके तसेच सर्व संचालक मंडळावर विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# वारकऱ्यांच्या सेवेत फिनोलेक्स पाईप्स, मुकुल माधव फाउंडेशनची सामाजिक बांधिलकी दृढ

**लातूर/प्रतिनिधी:** संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू तुकाराम महाराज पालखी सोहळा पंढरीच्या दिशेने रवाना होत असताना राज्यभरातून लाखो वारकरी आळंदी आणि देहूमध्ये दाखल झाले आहेत. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक असलेल्या पंढरपूर वारीशी फिनोलेक्स पाईप्सने गेली तीन दशके जपलेले सामाजिक बांधिलकीचे नाते यंदा अधिक दृढ केले आहे.

वारकऱ्यांच्या सेवेसाठी फिनोलेक्स पाईप्सतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांचे उद्घाटन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी फिनोलेक्स पाईप्स आणि मुकुल माधव फाउंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते. फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे कार्यकारी अध्यक्ष प्रकाश पी. छाब्रिया, मुकुल माधव फाउंडेशनच्या अध्यक्षा रितू पी. छाब्रिया यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविण्यात येत आहे. आठशे वर्षांहून अधिक काळापासून पांडुरंगाच्या भेटीसाठी शेकडो किलोमीटर पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांसाठी यंदा फिनोलेक्स पाईप्सक आणि त्यांचे सीएसआर भागीदार मुकुल माधव फाउंडेशनतर्फे सुमारे पाच लाख जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करण्यात येत आहे. यामध्ये तीन लाखांहून अधिक युटिलिटी बॅग, ५० हजार पावसाळी कुंचे (घोंगते), ज्येष्ठ वारकऱ्यांसाठी आधाराच्या काठ्या तसेच इतर आवश्यक साहित्याचा समावेश आहे. वारी मार्गावर विविध




ठिकाणी आयोजित मोफत वैद्यकीय शिबिरांतून आरोग्य तपासणी, तज्ज्ञांचा सल्ला, औषधे आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा पुरविली जात आहे.

वारीच्या यशस्वी व्यवस्थापनासाठी कार्यरत असलेल्या पोलिस प्रशासनालाही फिनोलेक्सने मदतीचा हात दिला आहे. हजारो पोलिस कर्मचाऱ्यांना रेनकोट आणि पंढरपूर पोलिसांच्या 'क्विक रिस्पॉन्स टीम'साठी विशेष जॅकेट्स देण्यात आले आहेत. तसेच पंढरपूर पोलिस विभाग आणि मंदिर समितीच्या सहकार्याने वारकऱ्यांच्या सोयीसाठी माहिती व सतर्कता फलक उभारण्यात येत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीमार्फत राबविण्यात येत असलेल्या 'चरणसेवा' उपक्रमांत स्वयंसेवकांना १० हजार टी-शर्ट्स व टोप्यांचे वाटप करण्यात येत आहे. पर्यावरण संवर्धनालाही प्राधान्य देत पंढरपूरमध्ये वृक्षारोपण मोहीम आणि महत्त्वाच्या ठिकाणी कचरापेट्यांची व्यवस्था करण्यात येत आहे. चंद्रकांत पाटील म्हणाले, भारतात 'पाईप' म्हटले की सर्वप्रथम फिनोलेक्स पाईप्स अँड फिटिंग्जचे नाव समोर येते. फिनोलेक्सने गेल्या ४५ वर्षांत महाराष्ट्रासह देशाच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे. उद्योग क्षेत्राबरोबरच सामाजिक उत्तरदायित्वही तितक्याच प्रभावीपणे जपणाऱ्या फिनोलेक्स पाईप्स आणि मुकुल माधव फाउंडेशनने गेली तीन दशके पंढरपूर वारीत वारकऱ्यांची सेवा करून समाजाप्रतीची बांधिलकी सिद्ध केली आहे.

वारकऱ्यांसाठी आरोग्यसेवा आणि इतर सुविधा उपलब्ध करून देणारा हा उपक्रम स्तुत्य आहे. या सेवाभावी उपक्रमाचे उद्घाटन करण्याची संधी मिळणे माझ्यासाठी आनंदाची बाब असून, फिनोलेक्ससारखी समाजहिताची परंपरा जपणारी कंपनी महाराष्ट्रात असल्याचा अभिमान वाटतो. फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे कार्यकारी अध्यक्ष प्रकाश पी. छाब्रिया म्हणाले, पंढरपूर वारी ही श्रद्धा, समर्पण आणि निःस्वार्थ सेवेचे प्रतीक आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील जनतेने, शेतकऱ्यांनी गेल्या ४५ वर्षांत फिनोलेक्सवर दाखविलेल्या विश्वासामुळेच आमचा प्रवास अधिक समृद्ध झाला आहे. वारकऱ्यांची सेवा करून त्या विश्वासाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा आमचा प्रयत्न आहे. फिनोलेक्सने ४५ वर्षांच्या वाटचालीत समाजसेवा आणि समुदाय विकासाला केंद्रस्थानी ठेवत पंढरपूर वारीशी असलेले नाते अधिक मजबूत केले असून, परंपरा आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा संगम साधणाऱ्या या उपक्रमाला विशेष महत्त्व आहे. समाजाशी आणि परंपरेशी असलेली आमची बांधिलकी यापुढेही कायम राहील.

फिनोलेक्स पाईप्सविषयी: गेल्या ४५ वर्षांपासून फिनोलेक्स पाईप्स भारताच्या जलसुविधा उभारणीत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. शेती, प्लंबिंग, स्वच्छता आणि औद्योगिक क्षेत्रासाठी उच्च दर्जाच्या पीव्हीसी पाइप्स व फिटिंग्जची निर्मिती करणारी ही कंपनी देशातील पहिली आणि एकमेव बॅकवर्ड-इंटिग्रेटेड पीव्हीसी पाईप्स उत्पादक आहे. अत्याधुनिक उत्पादन तंत्रज्ञान, देशव्यापी वितरण व्यवस्था आणि गुणवत्तेप्रती असलेली कटिबद्धता यामुळे फिनोलेक्सने ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे.

उत्पादनापुरते मर्यादित न राहता नावीन्य, शाश्वत विकास, लोकाभिमुख उद्योग आणि ग्राहककेंद्रित सेवा या मूल्यांवर कंपनीचा भर आहे. शेतकरी, प्लंबर, वितरक आणि विविध संस्थांशी दीर्घकालीन विश्वासाचे नाते निर्माण करत फिनोलेक्सने उद्योगविश्वात वेगळी ओळख निर्माण केली आहे. १९८१ पासून गुणवत्ता, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव या मूल्यांवर उभ्या असलेल्या कंपनीने समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि समुदाय सशक्तीकरणासाठी सातत्याने कार्य करण्याचा संकल्प कायम ठेवला आहे.

मुकुल माधव फाउंडेशनविषयी: फिनोलेक्स पाईप्सचे सीएसआर भागीदार असलेल्या मुकुल माधव फाउंडेशनची स्थापना १९९९ मध्ये झाली. देशातील २४ राज्ये आणि ४ केंद्रशासित प्रदेशांमध्ये कार्यरत असलेले हे फाउंडेशन गेल्या २५ वर्षांपासून आरोग्य, शिक्षण, ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण, पर्यावरण संवर्धन, जलसंधारण, स्वच्छता, दिव्यांग कल्याण, आपत्ती निवारण, क्रीडा आणि कौशल्य विकास अशा विविध क्षेत्रांत सातत्याने कार्यरत आहे. तळागाळातील वंचित घटकांना सक्षम बनविणे, समाजात समान संधी उपलब्ध करून देणे आणि शाश्वत विकासाला चालना देणे हे फाउंडेशनचे प्रमुख उद्दिष्ट आहे. विविध सामाजिक संस्था, उद्योगसमूह आणि स्थानिक भागीदारांच्या सहकार्याने फाउंडेशन सामाजिक परिवर्तनासाठी सातत्याने योगदान देत असून, संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकासाच्या १७ उद्दिष्टांना आणि भारत सरकारच्या सामाजिक उत्तरदायित्वाच्या १६ मार्गदर्शक तत्त्वांना अनुसरून समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी कार्य करत आहे.

# मध्य रेल्वे द्वारे ८०,००० प्रवाशांना सुमारे ६.०० कोटी रुपयांचा परतावा

## गेल्या वर्षीच्या तुलनेत प्रवाशांची संख्या आणि परताव्याची रक्कम दुप्पट

**मुंबई/ प्रतिनिधी :** दिनांक ६ जुलै २०२६ रोजी कर्जत आणि लोणावळा दरम्यान दरड कोसळल्यामुळे अनेक गाड्या रद्द कराव्या लागल्या, तसेच काही शॉर्ट टर्मिनेट, शॉर्ट ओरिजिनेट करण्यात आल्या, आणि काही गाड्यांच्या वेळा बदलाव्या लागल्या; परिणामी मोठ्या संख्येने प्रवाशांना आपला प्रवास करता आला नाही. या परिस्थितीला त्वरित प्रतिसाद देत, मध्य रेल्वेने सर्व विभागांमध्ये परताव्याची रक्कम जलद आणि विनासायास वितरित केली.

दिनांक ६ जुलै २०२६ रोजी, रेल्वे सेवेतील व्यत्ययामुळे प्रवास करू न शकलेल्या ७९,७४७ प्रवाशांना मध्य रेल्वेने ५.९१ कोटी रुपयांचा परतावा दिला. गेल्या वर्षी याच दिवशी, म्हणजेच दिनांक ६ जुलै २०२५ रोजी ३८,६८७ प्रवाशांना ३.०१ कोटी रुपयांचा परतावा देण्यात आला होता, त्या तुलनेत ही आकडेवारी आहे. यात ४१,०६० प्रवाशांची व २.८९ कोटी रुपयांची वाढ दिसून येते; म्हणजेच परताव्याच्या रकमेत ९६% आणि परतावा मिळालेल्या प्रवाशांच्या संख्येत १०६% वाढ झाली आहे.

मुंबई विभागात, दिनांक ६ जुलै २०२६ रोजी ३७,३३० प्रवाशांना २.८६ कोटी रुपयांचा परतावा देण्यात आला, तर दिनांक ६ जुलै २०२५ रोजी १७,४९० प्रवाशांना १.४२ कोटी रुपयांचा परतावा देण्यात आला होता. यावरून १९,८४० प्रवाशांची व १.४४ कोटी रुपयांची वाढ झाल्याचे दिसून येते; म्हणजेच परताव्याच्या रकमेत १०१% आणि परतावा मिळालेल्या प्रवाशांच्या संख्येत ११३% वाढ झाली आहे.

त्याचप्रमाणे, पुणे विभागात दिनांक ६ जुलै २०२६ रोजी २०,९८२ प्रवाशांना १.५६ कोटी रुपयांचा परतावा देण्यात आला, तर गेल्या वर्षी याच दिवशी ९,६८९ प्रवाशांना ७४.४६ लाख रुपयांचा परतावा देण्यात आला होता. यावरून ११,२९३ प्रवाशांची व ८१.८२ लाख रुपयांची वाढ दिसून येते; म्हणजेच परताव्याच्या रकमेत १०९% आणि परतावा मिळालेल्या प्रवाशांच्या संख्येत ११६% वाढ झाली आहे.

या कालावधीत, मध्य रेल्वेने स्थानकांवर अतिरिक्त कर्मचारी तैनात केले आणि प्रवाशांच्या विनंत्यांवर त्वरित कार्यवाही करण्यासाठी विशेष 'हेल्प डेस्क' सुरू केले. कामाचा प्रचंड ताण असूनही, प्रवाशांची गैरसोय कमी करणे आणि त्यांना देय रक्कम वेळेवर मिळवून देणे यावर विशेष भर देण्यात आला.

रेल्वे मार्ग पूर्ववत करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. प्रवाशांना प्रवासाला निघण्यापूर्वी गाड्यांची स्थिती तपासण्याचा सल्ला देण्यात येत आहे. मदतीसाठी, ते रेल्वेच्या हेल्पलाइनशी संपर्क साधू शकतात किंवा जवळच्या स्थानकावर चौकशी करू शकतात.

# सम्राट मित्रमंडळाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश; दोन वर्षापासून पडून असलेला 10 MVA ट्रान्सफॉर्मर अखेर बसविला

**अहमदपूर/ प्रतिनिधी :** अहमदपूर शहरातील वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत होता. या गंभीर प्रश्नाची दखल घेत सम्राट मित्रमंडळ, अहमदपूर यांच्या वतीने महावितरणकडे अनेक वेळा निवेदने देऊन तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली होती.तसेच येथे १० MVAचा एसटी चा ट्रान्सफॉर्मर हा गेल्या दिड ते दोन वर्षापासून जमीनीवर पडून होता तो तातडीने चार्ज करावा तसेच या समस्या कायम राहिल्यास महावितरण कार्यालयावर गाढव मोर्चा काढण्याचा इशाराही देण्यात आला होता.

या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची आणि जनआंदोलनाच्या इशाऱ्याची गंभीर दखल घेत महावितरण प्रशासनाने गेल्या दोन वर्षांपासून जमिनीवर पडून असलेला १० MVA क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर अखेर कार्यान्वित करण्याचे काम पूर्ण केले आहे.

आज सकाळी दोन हायड्राच्या सहाय्याने पूर्वीचा ५ MVAचा ट्रान्स्फॉर्मर काढुन या ठिकाणी १० MVAचा नवीन ट्रान्स्फॉर्मर बसविण्यात आला.हा ट्रान्स्फॉर्मर जरी एसटी विभागाचा असला तरी एसटी बसेस चार्ज करण्यासाठी १ ते २MVA लोड जावून इतर अतिरिक्त ७ ते ८ MVAभार शहरासाठी वापरण्यात मिळणार आहे हे विशेष.

या ट्रान्सफॉर्मरच्या स्थापनेमुळे अहमदपूर शहरावरील वाढता वीजभार कमी होण्यास मदत होणार असून, वारंवार होणारे लोडशेडिंग, कमी दाबाचा वीजपुरवठा आणि तांत्रिक अडचणी मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यामुळे शहरातील नागरिक, व्यापारी, उद्योग, शेतकरी आणि विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

यावेळी सम्राट मित्रमंडळाचे अध्यक्ष डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी सांगितले की, ही केवळ सम्राट मित्रमंडळाची नव्हे, तर अहमदपूरकरांच्या एकजुटीची ताकद आहे. जनहिताच्या प्रश्नांवर आम्ही नेहमीप्रमाणे ठाम भूमिका घेत राहू. नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी आमचा संघर्ष होता आहे यापुढेही अविरत सुरू राहील.

सम्राट मित्रमंडळाने या निर्णयाबद्दल महावितरण प्रशासनाचे स्वागत केले असून, आता नव्याने बसविण्यात आलेल्या ट्रान्सफॉर्मरचा नागरिकांना प्रत्यक्ष लाभ मिळावा आणि अहमदपूरचा वीजपुरवठा कायमस्वरूपी सुरळीत राहावा, अशी अपेक्षाही व्यक्त केली आहे.

# शाळा उघडल्या...पण पट का वाढत नाही?

## जीर्ण शाळा, शहरात राहणारे गुरुजी आणि ग्रामीण शिक्षणासमोरील मोठे संकट!

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- एकेकाळी गावातील जिल्हा परिषद शाळा म्हणजे ज्ञानाचे मंदिर होते. कौलारू शाळा, साधे वर्ग, तुटकी बाके आणि मर्यादित साधने असूनही त्या शाळेतून देशाला डॉक्टर, अभियंते, आयएएस अधिकारी, शिक्षक, सैनिक आणि समाजसेवक घडले.

त्या काळातील गुरुजींचा पगार कमी होता, पण समाजातील मान मोठा होता. गुरुजी गावातच राहत असल्याने विद्यार्थ्यांवर त्यांचे लक्ष असे. पालक आणि शिक्षक यांच्यात विश्वासाचे नाते होते. गावात वडिलांपेक्षाही गुरुजींचा दरारा मोठा होता. देवापेक्षाही गुरुजींना जास्त मान दिला जात होता.

मात्र काळ बदलला... गुरुजींची आर्थिक परिस्थिती सुधारली, शहरात घरे झाली, चारचाकी गाड्या आल्या; पण अनेक जिल्हा परिषद शाळांचे दारिद्र्य मात्र तसेच राहिले. शिक्षक गावाशी तुटत गेले आणि शाळाही विद्यार्थ्यांपासून दूर जाऊ लागल्या.

**खाजगी शिक्षणाच्या विळख्यात सरकारी शाळा**

आज गरीब बाप स्वतः उपाशी राहून मुलाला खाजगी शाळेत पाठवतो. कारण त्याला वाटते, माझ्या मुलाचे भविष्य माझ्यासारखे राहू नये. याच भावनेचा फायदा घेत अनेक खाजगी शाळांनी शिक्षणाचे व्यापारीकरण केले. फी, बस, गणवेश, पुस्तके, विविध शुल्कांच्या नावाखाली पालकांचा खिसा रिकामा केला जात आहे.

**१७ हजार शाळा बंद... कोण जबाबदार?**

राज्यात हजारो जिल्हा परिषद शाळा बंद पडल्या. अनेक शिक्षकांची पदे कमी झाली. ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था कमकुवत होत गेली. आजही अनेक ठिकाणी शाळांमध्ये विद्यार्थी नाहीत, तर काही ठिकाणी शिक्षकांची कमतरता आहे. हा प्रश्न केवळ सरकारचा नाही, तर संपूर्ण समाजाचा आहे.

**प्रवेशोत्सव नव्हे, गुणवत्तोत्सव हवा!**

आज फुगे लावून, रॅली काढून आणि गुलाबपुष्प देऊन प्रवेश मिळवण्याचा प्रयत्न केला जातो. पण पालकांना आता सजावट नको आहे; त्यांना दर्जेदार शिक्षण, आधुनिक वर्गखोल्या, डिजिटल शिक्षण, इंग्रजीसह गुणवत्तापूर्ण अध्यापन, सुरक्षित इमारत आणि विश्वास हवा आहे.

**शाळा वाचवण्यासाठी सर्वांनी पुढे यावे**

सरकारने निधी द्यावाच; पण शिक्षक, माजी विद्यार्थी, ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी आणि सामाजिक संस्थांनीही पुढाकार घेण्याची वेळ आली आहे. प्रत्येक शिक्षकाने आपल्या शाळेसाठी थोडे योगदान दिले, गावातून वर्गणी उभी राहिली आणि निवृत्त शिक्षकांनी आठवड्यातून काही तास विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, तर अनेक शाळांचे चित्र बदलू शकते.

**धाराशिव जिल्ह्यासाठी इशारा**

धाराशिव जिल्ह्यातील अनेक जिल्हा परिषद शाळा अजूनही गुणवत्तापूर्ण शिक्षण देत आहेत. मात्र घटती पटसंख्या, जीर्ण इमारती, खाजगी शाळांचे वाढते आकर्षण आणि बदलती मानसिकता ही गंभीर आव्हाने आहेत. केवळ शिक्षकांचे प्रश्न सोडवून चालणार नाही; शाळांचे आधुनिकीकरण, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि पालकांचा विश्वास जिंकणे तितकेच आवश्यक आहे.

# शालेय व्यवस्थापन समितींमार्फतच गणवेश खरेदी व वाटप करा; विद्यार्थ्यांना तात्काळ गणवेश द्या, अन्यथा आंदोलन - धाराशिव काँग्रेस



धाराशिव (प्रतिनिधी)- शालेय विद्यार्थ्यांना शासनाच्या नियमानुसार तात्काळ गणवेशाचे वाटप करण्यात यावे तसेच गणवेश खरेदी व वितरणाचा अधिकार शालेय व्यवस्थापन समितींमार्फतच राबविण्यात यावा, या मागणीसाठी धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

जिल्हाध्यक्ष उमेश राजे निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आलेल्या या निवेदनात, शैक्षणिक वर्ष सुरू होऊन बराच कालावधी उलटूनही जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांना अद्याप गणवेश मिळालेला नसल्याची गंभीर बाब निदर्शनास आणून देण्यात आली. गणवेशाअभावी विद्यार्थी आणि पालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, विद्यार्थ्यांच्या शिक्षणावरही त्याचा विपरीत परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच, शासनाच्या निर्णयानुसार गणवेश खरेदी व वाटपाची जबाबदारी अधिकारी व्यवस्थापन समितींना आहेत आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी ठाम मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली. विद्यार्थ्यांना तातडीने गणवेश उपलब्ध करून न दिल्यास तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अधिकार डावलण्याचा प्रयत्न झाल्यास जिल्हा परिषदअध्यक्ष व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनासमोर तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला.

यावेळी जिल्हाध्यक्ष उमेश राजे निंबाळकर यांच्यासह राजेंद्र शेरखाने, धनंजय राऊत, खलील सय्यद, सलमान शेख, गोरोबा झेंडे आणि बालाजी राठोड उपस्थित होते.

# गणेशराव सोनटक्के यांचा आदर्श उपक्रम;युवा नेते मल्हार दादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त बस थांबण्याचे लोकार्पण




धाराशिव (प्रतिनिधी)- तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील बस स्थानकावरील प्रवासी निवाऱ्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला. बसस्थानकावर प्रवाससाठी व नागरिकांसाठी अत्यंत गरजेचे असलेल्या प्रवासी निवाराचा प्रश्न माजी जिल्हा परिषद सदस्य, भाजपा नेते गणेशराव सोनटक्के व पंचायत समिती सदस्य ऍड. आशिष सोनटक्के यांनी भाजपाचे युवा नेते मल्हार राणाजगजितसिंह पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सोनटक्के यांनी स्वखर्चातून रोड लगत दोन्ही बाजूच्या प्रवासी निवारा बस थांब्याचे लोकार्पण शनिवारी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

जळकोट हे गाव राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वरती बसलेले आहे.या गावची लोकसंख्या १५ ते २० हजार लोकवस्तीचे गाव आहे. मुंबई हैदराबाद या राष्ट्रीय महामार्गावर

गाव असल्याने या ठिकाणच्या बसस्थानकावर सतत गर्दी असते. परंतु या बसस्थानकावर बसण्यासाठी जागाच नसल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल होत होते. महिला , शाळेचे विद्यार्थी व तसेच ज्येष्ठ नागरिक ,वयोवृद्ध प्रवासी मंडळी यांना तर उभारूनच एस टी ची वाट पहावी लागत होती. उन्हाळा, हिवाळा व पावसाळा या तिनी ऋतुत महिला प्रवासी, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, वयोवृद्ध असणाऱ्या मंडळींना ऊन, वारा, पावसाचा सामना करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन भाजपाचे युवा नेते मल्हार पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशराव सोनटक्के व पंचायत समिती सदस्य आशिष सोनटक्के यांनी स्वखर्चातून रोडच्या दोन्ही बाजूला प्रवासी निवारा उभे केले आहेत. या

निवाऱ्यात बसण्याची ही सोय करण्यात आली आहे. या प्रवासी निवारा बस थांबाचे दोन्ही बाजूकडील निवाराचे लोकार्पण जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम सभापती सिद्धेश्वरअण्णा कोरे, पंचायत समितीचे सभापती विक्रमसिंह देशमुख व पंचायत समितीच्या उपसभापती रोहिणीताई मेलगिरि यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक अशोकराव पाटील, प्रकाश चव्हाण, नळदुर्गचे नगराध्यक्ष बसवराज धरणे, विलास राठोड, अमृता चव्हाण, भिवाजी इंगोले, विवेकानंद निलगिरी, तंटामुक्ती अध्यक्ष यशवंत

पाटील, संजय अंगुले, संजय माने, इराणा स्वन्ने, चंद्रकांत स्वामी, अरुण लोखंडे, डी.डी. कदम,नागनाथ किलजे, हनुमंत अंगुले, विकास चूंगे, प्रताप बेडगे, राम जाधव, प्रवीण जाधव, बाळासाहेब पाटील, काशिनाथ पटणे, अशोक साखरे, श्रीशैल साखरे, नामदेव कागे, गणेश भोगे, विठ्ठल भोगे, सुभाष जाधव, मंगेश सुरवसे, दामोदर लोखंडे, पंकज पाटील, शरद भोसले, शेषेराव लोखंडे, शकील मुलानी, नसीर इनामदार, आदि उपस्थित होते. यावेळी तुळजापूर तालुक्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्हिडिओ कॉलद्वारे सोनटक्के यांनी स्वखर्चातून उभारलेल्या निवारा बसथांबाच्या लोकार्पण सोहळ्यास शुभेच्छा दिल्या. या उपक्रमाचे कौतुक केले. यामुळे प्रवाशांची गैरसोय थांबणार असल्याचे सांगितले. सोनटक्के परिवाराच्या वतीने केलेल्या या आदर्श उपक्रमाबद्दल प्रवाशातून समाधान व्यक्त केले जात आहे.

**लातूर समाचार धाराशिव**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**
**9284321472**

# पोदार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव येथे डॉक्टर्स डे उत्साहात साजरा



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- पोदार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव येथे स्कूलचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे सर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टर्स डे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये डॉक्टरांविषयी आदरभाव निर्माण व्हावा तसेच समाजातील त्यांच्या अमूल्य योगदानाची जाणीव व्हावी, या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात डॉक्टरांच्या कार्याचा गौरव करणाऱ्या प्रास्ताविकाने झाली. विद्यार्थ्यांनी डॉक्टरांच्या सेवाभावावर आधारित मनोगते, भाषणे व आकर्षक सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. काही विद्यार्थ्यांनी डॉक्टरांच्या वेशभूषेत येऊन आरोग्य, स्वच्छता आणि निरोगी जीवनशैलीबाबत महत्त्वपूर्ण संदेश दिला. यावेळी शाळेचे उपप्राचार्य श्री निलेश जाधव सर यांनी डॉक्टरांचे समाजातील योगदान अधोरेखित करत विद्यार्थ्यांना निरोगी सवयी अंगीकारण्याचे आवाहन केले. शिक्षकांनीही डॉक्टरांच्या निःस्वार्थ सेवाभावाचे कौतुक करून त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये डॉक्टरांविषयी आदर, कृतज्ञता आणि आरोग्याबाबत जागरूकता निर्माण झाली. कार्यक्रमाचे नियोजन शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडले.

या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन इयत्ता नववीचे वर्गशिक्षक श्री पांडुरंग चव्हाण सर व कार्यक्रमाधिकारी सुप्रिया रायगडे मॅडम यांनी अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने केले.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी शिवाय पीक विमा अर्ज होणार नाही: प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी ३१ जुलै अंतिम मुदत ; ई-पीक पाहणीही बंधनकारक

धाराशिव, (जिमाका) खरीप हंगामात नैसर्गिक आपत्ती, कीड व रोगांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्याची प्रक्रिया सुरू झाली असून,३१ जुलै २०२६ ही नोंदणी व विमा हप्ता भरण्याची अंतिम मुदत आहे.यंदापासून या योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकरी ओळखपत्र क्रमांक (AgriStack Farmer ID) अनिवार्य करण्यात आला असून, ई-पीक पाहणीद्वारे पिकांची वेळेत नोंद करणेही बंधनकारक असल्याने शेतकऱ्यांनी कोणताही विलंब न करता आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत अधिसूचित पिकांना नैसर्गिक आपत्ती, कीड व रोगामुळे नुकसान झाल्यास विमा संरक्षण दिले जाते.

योजनेची नोंदणी www.pmfby.gov.in या पोर्टलवर ऑनलाइन पद्धतीने सुरू आहे.मात्र,अर्ज करण्यासाठी AgriStack Farmer ID असणे अनिवार्य असून,ई-पीक पाहणीमध्ये संबंधित पिकांची नोंद वेळेत झालेली असणे आवश्यक आहे.त्यामुळे ज्यांनी अद्याप ॲग्रीस्टॅक नोंदणी केली नाही,त्यांनी ती तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

चालू खरीप हंगामात कर्जदार आणि बिगर कर्जदार अशा दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांसाठी विमा हप्ता भरण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ आहे. ही योजना दोन्ही गटांसाठी ऐच्छिक असली, तरी कर्जदार शेतकऱ्यांना योजनेत सहभागी व्हायचे नसेल तर नोंदणीच्या अंतिम मुदतीच्या किमान सात दिवस आधी संबंधित बँकेत विमा हप्ता कपात करू नये,यासाठी घोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे.अन्यथा संबंधित कर्जदार शेतकऱ्यांचा योजनेतील सहभाग बंधनकारक समजला जाईल.

सन २०२६-२७ पासून शासनाने सुधारित पीक विमा योजनेस मान्यता दिली आहे.या सुधारीत योजनेनुसार सोयाबीन आणि कापूस या पिकांच्या नुकसानभरपाईचे निर्धारण पीक कापणी प्रयोगातून मिळणारे उत्पादन आणि तंत्रज्ञानावर आधारित उत्पादन या दोन्हींच्या आधारे करण्यात येणार आहे. तर इतर अधिसूचित पिकांसाठी नुकसानभरपाईचे निर्धारण नियमित पीक कापणी प्रयोगातून मिळणाऱ्या उत्पादनाच्या आधारे करण्यात येईल.

ज्या शेतकऱ्यांनी पेरणी केली आहे किंवा पेरणी करावयाची आहे,त्यांनी बाजरी व कापूस या पिकांसाठी १.५० टक्के,मका,मूग,उडीद,तूर व सोयाबीन या पिकांसाठी २ टक्के, तर खरीप कांदा या पिकासाठी २.५० टक्के शेतकरी हिस्सा भरून विमा अर्ज सादर करावा.

विमा अर्जासाठी स्वयंघोषणापत्र, सातबारा व ८-अ उतारा, आधार कार्ड, AgriStack Farmer ID आणि बँक पासबुकची झेरॉक्स प्रत आवश्यक आहे.ही कागदपत्रे घेऊन शेतकरी आपले सरकार सेवा केंद्र, कॉमन सर्व्हिस सेंटर (CSC) किंवा संबंधित बँकेमार्फत पीक विमा पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करू शकतात.

यंदा अधिसूचित पिकांमध्ये बाजरी (विमा संरक्षित रक्कम ३२,००० रुपये प्रति हेक्टर,शेतकरी हिस्सा ४८० रुपये),सोयाबीन (६२,५०० रुपये,हिस्सा १,२५० रुपये),मूग (३०,००० रुपये,हिस्सा ६०० रुपये), उडीद (२७,००० रुपये,हिस्सा ५४० रुपये),तूर (४७,००० रुपये,हिस्सा ९४० रुपये),कापूस (६५,०००रुपये, हिस्सा ९७५ रुपये),मका (४०,००० रुपये,हिस्सा८०० रुपये) आणि खरीप कांदा (७५,०००रुपये,हिस्सा १,८७५ रुपये) या पिकांचा समावेश असून,संबंधित शेतकऱ्यांनी निर्धारित शेतकरी हिस्सा भरून वेळेत विमा संरक्षणाचा लाभ घ्यावा.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की,अंतिम मुदतीची वाट न पाहता त्वरित प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी व्हावे. ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी,ई-पीक पाहणी आणि वेळेत ऑनलाइन नोंदणी या तीन बाबींची पूर्तता केल्यासच विमा संरक्षणाचा लाभ सहज मिळू शकतो. नैसर्गिक संकटांपासून आर्थिक सुरक्षा मिळविण्यासाठी प्रत्येक पात्र शेतकऱ्याने या योजनेत सहभागी होऊन आपल्या पिकांचे संरक्षण करावे.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649